
दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले
बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | गुरुवार २ ऑक्टोबर २०२५ | अंक २८२ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

## RSS ला 100 वर्ष पूर्ण, यंदाच्या दसरा मेळाव्याला रामनाथ कोविंद यांची प्रमुख उपस्थिती

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) चा यंदाचा दसरा मेळावा हा खास असणार आहे. कारण यावर्षी संघाच्या स्थापनेला १०० वर्ष पूर्ण होणार आहेत, या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे उपस्थित राहणार आहेत.**



राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) चा यंदाचा दसरा मेळावा हा खास असणार आहे. कारण यावर्षी संघाच्या स्थापनेला 100 वर्ष पूर्ण होणार आहेत, या विजयादशमीपासून संघाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होणार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नागपुरात विजयादशमीनिमित्त विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दसरा मेळाव्याला उद्या सकाळी 7:35 वाजता सुरुवात होणार आहे. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे या दसरा मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. सरसंघचालक मोहन भागवत हे दसरा मेळाव्याच्या निमित्तानं मार्गदर्शन करणार आहेत.

या विजयादशमीपासून संघाच्या शताब्दी वर्षाची सुरुवात होणार आहे. त्यामुळे यंदाच्या विजयादशमीपासून ते २०२६ च्या विजयादशमीपर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष साजरे करणार आहे, या काळात देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येणार आहे. डॉ. हेडगेवार यांच्या घरी 17 जणांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना झाली होती, १७ एप्रिल १९२६ रोजी



झालेल्या बैठकीमध्ये या संघटनेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे नाव निश्चित करण्यात आलं. १९२६ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पहिला दसरा मेळावा पार पडला होता. यंदा संघाला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत. उद्या विजयादशमीनिमित्त संघाचे तीन ठिकाणांहून पथसंचनल निघणार आहे, हे तिनही पथसंचलन सकाळी 7:45 वाजता नागपूरच्या व्हरायटी चौकात एकत्र येणार आहेत. पथसंचलनानंतर योगाचे प्रात्यक्षिकही सादर केली जाणार आहेत.

### मोहन भागवत यांच्या भाषणाकडे लक्ष

या विजयादशमीला संघाच्या स्थापनेला 100 वर्ष पूर्ण होणार आहेत, त्यामुळे हा दसरा मेळावा संघासाठी खास असणार आहे. संघाला शंभर वर्ष पूर्ण होत आहेत, त्याचसोबत यंदाच्या विजयादशमीपासून ते २०२६ च्या विजयादशमीपर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष साजरे करणार आहे, या सर्व पार्श्वभूमीवर सरसंघचालक मोहन भागवत उद्याच्या दसरा मेळाव्यात काय मार्गदर्शन करणार? संघ स्वयंसेवकांना कोणता संदेश देणार? याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे.

## अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान शासनाने तात्काळ पंचनामे करा- मंगेश वनवे

पाटोदा प्रतिनिधी :-
पाटोदा तालुक्यातील झालेल्या मुसळधार पावसाने. हाहाकार माजवला आहे. तालुक्यातील अनेक भाग पाण्याखाली गेला असून नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. सततच्या पावसा मुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे पिके पाण्याखाली असल्याने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले आहे. गावांमधील रस्ते, ओढे व पुलांवर पाणी आल्याने मोठमोठे खड्डे पडल्याने वाहतूक ठप्प झाली आहे. काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे संसार उपयोगी साहित्य



देखील वाहुन गेले आहे. प्रशासनाने तात्काळ शेतकऱ्याच्या शेतात जाऊन पंचनामे करावे व तत्काळ शेतकऱ्याला मदत करावी. सततच्या पावसामुळे लोकांच्या घरे पडले आहेत त्यांचेही पंचनामे करून तात्काळ मदत करावी.



अशी मागणी युवा सेना तालुकाध्यक्ष मंगेश वनवे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे मागणी केली आहे.

## मराठा सेवा संघ मदतीचा हात घेऊन पूरग्रस्तांच्या दारात



बीड (प्रतिनिधी) मागील अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे आणि नंतरच्या काळामध्ये गोदावरी नदीमध्ये जायकवाडी प्रकल्पातून सोडलेल्या पाण्यामुळे बीड जिल्ह्यातील, सिंदफणा, मांजरा, गोदावरी नद्यांच्या खोऱ्यातील अनेक भागात पुराचे संकट ओढवले आहे. अनेक ठिकाणी नद्यांनी पात्र सोडल्यामुळे लोकांची घरं-दारं, गुर, शेती वाहून गेली. उघड्या डोळ्यांनी पाहिलेले शेतातलं हिरवं सपान मातीत मिसळलं, उन्हाळ्यापासून केलेली मशागत, पेरणी, लागवड, आंतरमशागत, खते, बियाणे, केलेले कष्ट, गाळलेला घाम आणि पाहिलेलं स्वप्न, सण, उत्सव, लेकरांच शिक्षण पाहता पाहता सगळं सगळं पाण्यात गेलं. जिकडे तिकडे पाणीच पाणी झालं. नदी काठावरच्या लोकांना गावं, घरं सोडून जीव वाचवण्यासाठी बाहेर पडावं लागलं. अन्न, वस्त्र, निवारा शिक्षण आरोग्य अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. अशा परिस्थितीमध्ये महाराष्ट्रभरातून मदतीचा ओघ सुरू झाला. बीड जिल्हा मराठा सेवा संघाने पूरग्रस्तांसाठी एक हात मदतीचा या केलेल्या आवाहनाला भरभरून प्रतिसाद मिळाला. बीड जिल्ह्यातील डॉक्टर्स, इंजिनियर्स, वकील, शिक्षक, प्राध्यापक, व्यावसायिक, उद्योजक, व्यापारी, अधिकारी कर्मचारी, सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक यांनी सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून मोठ्या मनाने भरभरून पाठबळ दिलं. ती मदत मराठा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांनी पूरग्रस्तांपर्यंत पोहोचवली. सिंदफना नदीकाठच्या टाकळगाव, नांदूर हवेली, हिरापूर, पारगाव जप्ती या गावांसह गोदावरी नदीकाठच्या गुंजथडी, सुरूमगाव या गावात जाऊन पूरग्रस्तांना उद्याच्या दसऱ्याच्या सणासाठी किराणा किट देऊन मदत केली. यावेळी बीड जिल्हा मराठा सेवा संघ व सर्व पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते.




## मुख्य मार्गाच्या रुंदीकरणासह सहकार भवन, तारांगण, क्रीडा संकुलाच्या कामांना गती द्या

**डॉ.योगेश क्षीरसागर यांची सा.बां. विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.**

बीड (प्रतिनिधी) दि.१ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बीडमध्ये मंगळवारी (दि.३०) छत्रपती संभाजीनगर येथील सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांच्यासह बीडच्या विभागातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली. शहरातील शिवाजी महाराज पुतळा व पुढे महालक्ष्मी चौक रस्त्याचे ३० मीटर रुंदीकरण, बार्शी नाका ते छत्रपती संभाजी महाराज चौक (समनापूर चौक, बायपास) रस्त्याचे रुंदीकरण व नाली बांधकाम यांसह सहकार भवन, तारांगण प्रकल्प, क्रीडा संकुलाच्या कामांना गती द्यावी, अशा सूचना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.यावेळी कार्यकारी अभियंता रविंद्र तोंडे,



उपकार्यकारी अभियंता चंद्रकांत बोराडे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मुख्य अभियंता श्री.चव्हाण यांच्याशी भ्रमणध्वनीवरून चर्चा झाली. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सोलापूर-छत्रपती संभाजीनगर प्रमुख जिल्हा मार्ग क्रमांक ७९ वरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महालक्ष्मी चौक या दरम्यान ३० मीटर रुंदीचा सिमेंट रस्ता, नाली बांधकाम तसेच दुभाजकाचे काम करण्यात यावे, अशी मागणी केली. त्याचप्रमाणे बार्शी नाका ते छत्रपती संभाजीनगर चौक या रस्त्याचे रुंदीकरण व नाली बांधकाम करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, सहकार संकुल येथील प्रलंबित कामाची निविदा लवकर जाहीर करून ते काम तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना त्यांनी केल्या. तसेच, शहरातील पंढरी नगर येथे मंजूर असलेल्या तारांगण प्रकल्पासाठी जागेचे दस्तावेज सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तत्काळ सुपूर्द करावेत, यासाठी नगरपरिषद मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याशी त्यांनी चर्चा करून सूचना दिल्या. तसेच, छत्रपती शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल येथे मंजूर विविध विकासकामांचा त्यांनी सविस्तर आढावा घेतला. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## मिठाईवर लावलेला चांदीचा वर्क खाण्यायोग्य असते का? माहितीये?



सण असो किंवा कोणताही कार्यक्रम असो प्रत्येक आनंदाच्या क्षणी मिठाई तर असतेच. कारण गोडाशिवाय तर कोणाताही आनंदाचा क्षण हा सेलिब्रेट केला जाऊच शकत नाही. मग ती मिठाई कोणतीही असो जसं की, काजू कतली, बर्फी आणि लाडू. पण तुम्ही पाहिलं असेल की काही मिठाईंवर चांदीचा वर्क असतो. जे दिसायला देखील सुंदर असते. पण काहीवेळेला असा प्रश्न असा पडतो, की हे चांदीचे वर्क खाण्यायोग्य असते का? म्हणजे ते कशापासून बनलेले असते, त्या चांदीच्या वर्कसहीत ती मिठाई खाणे सुरक्षित असते की नाही. तसेच हे चांदीचे वर्क शाकाहारी असते की मांसाहारी याबद्दल देखील अनेकांना प्रश्न पडतो. काहींच्या मते चांदीचे वर्क बनवण्यासाठी प्राण्यांच्या ऊतींचा वापर केला जातो असंही म्हटलं जातं. ज्यामुळे शाकाहारी लोकांमध्ये गोंधळ निर्माण झाला. आज, नियम आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे, हा प्रश्न बदलला आहे. पण तरीही हे चांदीचे वर्क मूळतः कसे बनवले जाते? त्याचे उत्पादन कसे होते? तसेच मिठाईवरील चांदीचे वर्क शाकाहारी असते की मांसाहारी? हे देखील पाहुयात.

चांदीचे वर्क म्हणजे काय?

चांदीचे वर्क म्हणजे एक अत्यंत पातळ चांदीचे फॉइल जे मिठाईच्या पृष्ठभागावर सजवण्यासाठी लावले जाते. ते खाण्यायोग्य असते आणि रंग, वास किंवा चव बदलत नाही. त्याचा प्राथमिक उद्देश मिठाईचे स्वरूप वाढवणे आहे. पारंपारिकपणे, ते हाताने कुटून बनवले जात असे, ज्यामुळे ते पातळ आणि नाजूक दिसू लागते.

पारंपारिक उत्पादन आणि शाकाहारी गोंधळ

पूर्वी, चांदीचे काम तयार करण्यासाठी कागदाऐवजी प्राण्यांच्या कातडीचा किंवा आतड्यांचा वापर केला जात असे. या तंत्रामुळे चांदी पातळ झाली आणि वेगळे करणे सोपे झाले, परंतु त्यामुळे शाकाहारी लोकांमध्ये प्रश्न निर्माण झाले. अनेक कुटुंबांना सणांच्या वेळी प्राण्यांच्या घटकांपासून बनवलेल्या मिठाई देणे अस्वीकार्य वाटले.

FSSAI नियम आणि बदल

ऑगस्ट 2016 मध्ये, FSSAI ने स्पष्ट केले की चांदीच्या कामाच्या निर्मितीमध्ये कोणत्याही प्राण्यांच्या उत्पादनांचा वापर केला जाऊ शकत नाही. यामुळे चांदीचा प्लेटिंग पूर्णपणे व्हेगन झालं. उत्पादक आता चर्मपत्र किंवा सिंथेटिक शीट वापरून काम तयार करण्यासाठी यंत्रसामग्री वापरतात. अनेक ब्रँड व्हेगन प्रमाणपत्र देखील देतात.

शाकाहारी मिठाई कशी ओळखावी?

1. लेबल तपासा: पॅक केलेल्या मिठाईंमध्ये अनेकदा स्पष्टपणे लिहिलेले असते की चांदीचे काम शाकाहारी आहे की नाही.
2. विक्रेत्याला विचारा: कामाच्या स्त्रोताबद्दल स्थानिक मिठाई विक्रेत्याशी चौकशी करा. 3. पर्याय: शंका असल्यास, काममुक्त काजू कतली आणि बर्फी निवडा, जे तितकेच स्वादिष्ट आहेत.

# म्हाळस जवळा रोहयो कामांवर चौकशीचा बडगा; ज्ञानेश्वर खाडे यांच्या तक्रारीनंतर मंत्र्यांचा थेट आदेश!

### म्हाळसजवळा येथील ५४ कामांवर चौकशीची झडती!



बीड, प्रतिनिधी- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अनुषंगाने शिवसेना उपजिल्हाप्रमुख श्री. ज्ञानेश्वर रामेश्वर खांडे पाटील, मौजे म्हाळसजवळा ता. जि. बीड यांच्याकडून रोहयो मंत्री भरत शेठ गोगावले यांच्याकडे लेखी तक्रार देण्यात आली होती. म्हाळस जवळा येथील रोहयो कामाची सबंधित तक्रार देण्यात आली होती. उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार सदर अर्जावर उचित कार्यवाही करावी व सदर तक्रारीचा त्वरीत निपटारा करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत तक्रारदारास परस्पर कळवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास टपाली सादर करावा. असे अप्पर सचिव मळेकर यांच्या सहीने आदेशाचे पत्र रोहयो आयुक्त, बीड जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले आहे. म्हाळस जवळा येथील पाणंद रस्ते, खडीकरण व इतर सर्व 54 सार्वजनिक कामांची चौकशी लावण्यासंदर्भात उपजिल्हाप्रमुख ज्ञानेश्वर खांडे यांनी रोहयो मंत्री भरत शेठ गोगावले यांची भेट घेऊन तक्रार दिली होती. या तक्रारीची दखल तत्काळ घेण्यात आली आहे.

# भगवान भक्ती गडावरील दसरा मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहा - दत्ता धस



केज दि.०१ ( प्रतिनिधी ) सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर भाजप नेत्या तथा महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री आ. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या दसरा मेळाव्याला बीड जिल्ह्यातील मुंडे समर्थकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन बीड जिल्ह्याचे भाजपा जेष्ठ नेते दत्ता धस यांनी केले आहे.

स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांनी सुरू केलेली दसरा दसरा मेळाव्याची परंपरा त्यांच्या कन्या महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री आ. पंकजाताई मुंडे आणि माजी खा. डॉ.प्रतिमाताई मुंडे यांनी कायम ठेवली आहे. संतश्रेष्ठ भगवान बाबा यांच्या जन्मभूमी सावरगाव घाट येथील भगवान भक्ती गडावर दरवर्षी घेण्यात येणाऱ्या दसरा मेळाव्याची यार्षीही जय्यत तयारी सुरू झाली आहे. यंदाचा २ ऑक्टोबर रोजी होत असलेला दसरा मेळावा हा मंत्री आ. पंकजाताई मुंडे आणि माजी खा. डॉ. प्रतिमाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक होणार असल्याने बीड जिल्ह्यातील मुंडे समर्थकांनी या ऐतिहासिक मेळाव्याचे साक्षीदार होण्यासाठी या दसरा मेळाव्यास लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन बीड जिल्ह्याचे भाजपा ज्येष्ठ नेते दत्ता धस यांनी केले आहे.

# शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे हायस्कूल, बीड मध्ये

## नमो संजीवनी स्वास्थ्य अभियान अंतर्गत मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



बीड / प्रतिनिधी: दि- 30/09/2025 रोजी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून मा.ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली,श्री.विजयजी हरगुडे प्रदेश अध्यक्ष भाजपा कामगार मोर्चा महाराष्ट्र यांच्या आदेशाने,शंकरजी देशमुख यांच्या सहकार्याने भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश महासचिव, श्री.ज्योतिबा लक्ष्मण नन्नवरे (दादासाहेब नन्नवरे), कामगार मोर्चा बीड जिल्हा अध्यक्ष ओमप्रकाश गिरी यांनी 'नमो संजीवनी स्वास्थ्य अभियान' अंतर्गत मोफत आरोग्य आणि नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले. बीड येथील डॉ. बापुजी साळुंखे हायस्कूल मध्ये हे शिबिर पार पडले, ज्यात १७६ विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची आरोग्य आणि नेत्र तपासणी करून त्यांना आवश्यक औषधोपचार देण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरासाठी शासकीय जिल्हा रुग्णालय, बीड यांनी आरोग्य तपासणी तर सिद्धिविनायक आय केअर यांनी नेत्र तपासणीची जबाबदारी सांभाळली. यावेळी आयोजक श्री.ज्योतिबा नन्नवरे यांच्यासोबत भाजपा नेते बालाजी पवार, भाजप कामगार मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष श्री. ओमप्रकाश गिरी, महिला मोर्चाच्या प्रदेश सचिव श्रीमती संध्या राजपूत,तसेच सर्व आरोग्य अधिकारी, कर्मचारी आणि पालक वर्ग उपस्थित होता, या कार्यक्रम प्रसंगी प्रशालेचे मुख्यध्यापक डॉ मुरूमकर सर यांनी मार्गदर्शन केले,शाळेतील श्री.तांदळे सर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. शिक्षक श्री कुवर सरांनी आभार व्यक्त केले. याप्रसंगी शिक्षक श्री मुंडे सर, श्रीमती आव्हाड मॅडम, श्रीमती मुंडे मॅडम, श्री मोराळे सर, प्रशालेचे वरिष्ठ लिपिक श्री नवले सर सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी, तसेच पालक व परिसरातील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# सरसकट पंचनामे करा ; कोणाच्याही नुकसानीची नोंद राहणार नाही याची काळजी घ्या - आ. नमिता मुंदडा

केज / प्रतिनिधी :- केज तालुक्यात सर्वच मंडळात अतिवृष्टीची नोंद झालेली असल्याने सरसकट पंचनामे करावेत. त्यात कोणताही कसुर करू नये. कारण आजच्या या नैसर्गिक आपत्तीत अडचणीत असलेल्या सर्वसामान्यांसाठी आपणच देव आहात म्हणून कोणाचेही नुकसान होणार नाही, याची काळजी घ्या. कारण आपली चुक एखाद्याचे आयुष्य सुधारू अथवा बिघाडू शकते. म्हणून मानवीय मदतीचा द्दष्टिकोन तेवत ठेवा, अशा सूचना आ. नमिता मुंदडा यांनी अधिकारी वर्गास केल्या. केज तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या बाबत सर्व विभागाच्या कार्यालय प्रमुखांच्या नैसर्गिक आपत्ती आढावा बैठकीचे आयोजन आ. नमिता मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात काल सोमवारी (दि. 29) करण्यात आले होते. यावेळी आ. मुंदडा या बोलत होत्या. यावेळी उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे , तहसीलदार राकेश गिड्डे , जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा , कृउबा चे उपसभापती डॉ वासुदेव नेहरकर , भाजपा तालुकाध्यक्ष भगवान




केदार , नेताजी शिंदे , सुनील गलांडे , वसंत केदार ,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी , भाजयुमो चे राहुल गदळे , शरद इंगळे , प्रकाश जाडकर , खदिर खुरेशी यांची प्रमुख उपस्थिती होती

पुढे बोलताना आ. मुंदडा म्हणाल्या की, तालुक्यात अनेक छोट्या मोठ्या तलावांचे नुकसान झाले असण्याची शक्यता लक्षात घेत त्यांचे सर्वेक्षण तिन्ही विभागाच्या कर्मचाऱ्यांनी एकत्रितरित्या दोनच दिवसात करावे. रस्ते, शाळा, पुल, विद्युतपोल आदींच्या नुकसानीचेही प्रत्यक्ष जाऊन माहिती घ्या. जमीन खरडून गेलेल्या क्षेत्राबरोबरच नदीशेजारी असलेल्या उसाच्या नुकसानीचेही पंचनामे करावेत अशाही सूचना त्यांनी यावेळी दिल्या . तसेच प्रत्येक विभागाने आपापल्या विभागाचे झालेल्या नुकसानीचे अहवाल विहित वेळेत जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करा. हे अहवाल त्यांच्यापर्यंत पोहोचले आहेत की नाही याची देखील खातरजमा करा, अशा सूचना त्यांनी दिल्या. अधिकाऱ्यांना वरिष्ठ स्तरावर काही अडचणी असतील, तर त्या कळवा त्यावर आपण लागेल ती मदत करू, असेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच या आव्हानात्मक परिस्थितीत तहसीलदार राकेश गिड्डे यांनी तळमळीने केलेल्या कामाचे आ. नमिता मुंदडा यांनी यावेळी कौतुकही केले.

तालुक्यात अतिवृष्टीने नुकसान होऊन हतबल झाल्याने आत्महत्या केल्याच्या तीन घटना घडल्या आहेत, पशुधनाच्या नुकसानीच्या वीस घटना नोंद झाल्या आहेत. घरांच्या पडझडीच्या छत्तीस घटना घडल्या असून चाळीस विहिरींचे नुकसान झाले आहे. तर एकशे त्रेचाळीस घरात पुराचे पाणी जाऊन त्या कुटुंबाना तात्पुरते स्थलांतरित करण्यात येऊन प्रत्येक कुटुंबास पाच हजार रुपयांची मदत देण्यात आली. तर शेतजमीन पुराच्या पाण्याने खरडून गेल्याचे 557 शेतकऱ्यांनी नोंद केली आहे. तर शेतातील ठिबक, सोलार व पाईप यांच्याही नुकसानीचे पंचनामे करण्यात येत असल्याची माहिती तहसीलदार राकेश गिड्डे यांनी यावेळी दिली. अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे जनावरे दगावली असून काहींच्या घरांचे नुकसान झाले आहे. अशा बाधित शेतकरी व नागरिकांना प्रातिनिधिक स्वरूपात मदत म्हणून धनादेशाचे वाटप आ मुंदडा यांच्या हस्ते यानिमित्ताने करण्यात आले. या बैठकीस गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे , कृषी अधिकारी सागर पठाडे , ता आरोग्य अधिकारी गवळी , नपचे मुख्याधिकारी अजित ढोपे , उपजिल्हारुग्णालयाचे डॉ. दत्तात्रय केंद्रे , व सर्वच विभागप्रमुखांची उपस्थिती होती

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
गुरुवार २ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



## हळदीचे पाणी की दूध तुमच्यासाठी कोणते आहे आरोग्यदायी,



आपले आरोग्य तंदुरस्त राहावे यासाठी प्रत्येकजण आपल्या आहारात पौष्टिक सात्विक आहार घेत असतो. त्यासोबतच अनेकजण रोजच्या आहारात हळदीचे दूध पित असतात. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांसाठी हळदीचे दुध फायदेशीर आहे. स्वयंपाकघरात सहज उपलब्ध असलेली हळद ही गुणधर्मांचा खजिना आहे आणि त्यातील कर्क्यूमिन कंपाऊंड अनेक आरोग्य समस्या दूर करण्यास मदत करते. अशातच तुम्ही दूध किंवा पाण्यात वापरत असलेली हळद शुद्ध असणे अत्यंत महत्वाचे आहे. आजकाल बाजारात हळदीमध्ये रंग मिसळले जातात, जे फायदेशीर होण्याऐवजी शरीरासाठी नुकसानकारक ठरू शकते. तर आजच्या लेखात आपण जाणून घेऊयात की हळदीचे दूध की हळदीचे पाणी पिणे अधिक फायदेशीर ठरू शकते. दूधात किंवा पाण्यात हळद मिक्स करून पिणे फायदेशीर मानले जाते कारण त्यात भरपूर पोषक तत्वे असतात. तथापि या दोन्ही घटकांसह हळद मिक्स करून प्यायल्याने शरीरावर वेगवेगळे परिणाम होतात. रात्री हळदीचे दूध पिणे श्रेयस्कर मानले जाते कारण यामुळे झोपेच्या समस्या निर्माण होत नाही. हेल्थलाइनच्या मते, हळदीमध्ये बायोएक्टिव्ह संयुगे असतात आणि त्यात दाहक-विरोधी गुणधर्म देखील भरपूर असतात. हळदीचे पाणी की हळदीचे दूध कोणते आरोग्यदायी आहे ते जाणून घेऊयात? हळदीचे दूध किंवा पाणी

आरोग्य तज्ञांच्या मते हळदीचे दूध आणि हळदीचे पाणी दोन्ही फायदेशीर आहेत, परंतु त्यांचे तुमच्या शरीरावर होणारे परिणाम वेगळे होत असतात. जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल किंवा शरीराला विषमुक्त करायचे असेल तर हळद पाण्यासोबत घ्यावी. जेव्हा तुम्ही दुधासोबत हळद घेता तेव्हा ती शरीरात लगेच शोषली जाते कारण जेव्हा ती दुधात मिक्स केल्याने कॅल्शियम प्रदान करते. तसेच रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि सर्दी आणि खोकल्यापासूनही आराम मिळतो.

हळद हृदय निरोगी ठेवते

नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसिनमध्ये दिलेल्या माहितीनुसार , हळद तुमचे हृदय निरोगी ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकते. हळदीमध्ये कर्क्यूमिन हे सक्रिय संयुग असते आणि असंख्य अभ्यासातून असे दिसून आले आहे की कर्क्यूमिन वृद्धत्व आणि लठ्ठपणाशी संबंधित हृदयरोगाचा धोका कमी करण्यास हातभार लावू शकते. हळदीचे हे देखील फायदे आहेत

हेल्थलाइनच्या मते हृदयरोगाचा धोका कमी करण्यासोबतच हळदीतील करक्यूमिन संयुग मेंदूच्या पेशींच्या विकासाला चालना देण्यास मदत करते. हळद जळजळ रोखते आणि मुक्त रॅडिकल्सपासून संरक्षण करते. करक्यूमिन सप्लिमेंट्स संधिवात असलेल्या रुग्णांसाठी देखील फायदेशीर मानले जातात, जो सांध्याचा आजार आहे.

हळदीचे पाणी कसे बनवायचे?

तुम्हाला जर शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यासाठी किंवा वजन कमी करण्यासाठी तुमच्या आहारात हळदीचे पाणी समाविष्ट करायचे असेल, तर सकाळी रिकाम्या पोटी ते घेणे चांगले. कच्च्या हळदीचे तुकडे करून रात्रभर पाण्यात भिजवणे चांगले, किंवा कच्ची हळद किसून पाण्यात घाला, ती पूर्णपणे उकळवा आणि नंतर कोमट पाणी प्या.

हळदीच्या दुधाचे फायदे

## नवगण महाविद्यालयात समाजशास्त्र विषयावरील व्याख्यान

परळी वैजनाथ, दि. __ (प्रतिनिधी) : नवगण महाविद्यालयात "समाजशास्त्राचा उदय आणि विकास" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी वैद्यनाथ महाविद्यालयाचे समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आर. डी. राठोड हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे



प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे होते. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. लालासाहेब घुमरे, समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजा आचार्य आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. राठोड यांनी समाजशास्त्राच्या उदयाचा ऐतिहासिक मागोवा घेत त्याच्या विकासाची प्रक्रिया स्पष्ट केली. आधुनिक समाजव्यवस्थेत समाजशास्त्राचे महत्त्व आणि सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी त्याचा उपयोग यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ हांगे यांनी बदलत्या समाजाच्या समस्या व उपयोजित बाबी विषयी सविस्तर चर्चा केली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. अनूरथ चंद्रे यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी तसेच समाजशास्त्र विषयातील रसिकांची उपस्थिती लाभली.

## शूटिंग बॉल स्पर्धेत पी.एम श्री जि. प.मा.कन्या शाळेचा संघ जिल्हास्तरावर प्रथम

माजलगाव( प्रतिनिधी):महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा संचलनालय व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येत असलेल्या शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये शूटिंग बॉल स्पर्धेच्या जिल्हास्तरीय सामन्यात पी.एम श्री जिल्हा परिषद माध्यमिक कन्या शाळा माजलगाव येथील 17 वर्षे वयोगटातील मुलींच्या संघाने जिल्हास्तरावर अंतिम सामन्यात जानपीर विद्यालय नाळवंडी ता.पाटोदा सोबत 10-25 ने दणदणीत विजय मिळवून प्रथम येत घवघवीत यश संपादन केले आहे.विभाग स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत विजयी संघ बीड जिल्ह्याचे नेतृत्व करणार आहे. विजयी संघाला प्रशिक्षक अब्दुल शेख व राजकुमार सोनपसारे यांचे मार्गदर्शन मिळाले.विजयी संघात कर्णधार शितल राठोड,अक्षरा पवार,सोमेश्वरी टाक,साक्षी कुलकर्णी,अंजली कुंभार,रूची दळवी,अनन्या चव्हाण,शितल वावळकर,पुनम राठोड,अलिना शेख या खेळाडूंचा समावेश आहे.



या यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी,तालुका क्रीडा अधिकारी अनिकेत काळे,क्रीडा संयोजक सचिन मोती,शूटिंग बॉल असोसिएशनचे मस्के भगीरथ,तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सदस्य,शाळेचे मुख्याध्यापक मिलिंद गरबडे,सहशिक्षक मधुकर मकसरे, बाळासाहेब सोनसळे,शरद नायबळ,सुंदर काळे,नारायण भाळशंकर,चंद्रकांत यादव,बालासाहेबकांबळे,हनुमान शेरकर, सौदागर हसीब,सहशिक्षिका मंदा सारूक,संगीता राठोड,ज्योती कोडगीरकर, जयश्री लोणीकर,संगीता शिंदे,अंबिका कुचेकर,शितल राठोड,हिरा मगर,आसमा शेख, अनिता पौळ,गोरख उघडे,संतोष साळवे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या

## मदत नव्हे हे माझे कर्तव्य माजी नगराध्यक्ष रामप्रभु मुंढे
## पूरग्रस्त बरकत नगर मधील नागरिकांना अन्नधान्य कीटचे केले वाटप

**मकरंद चिनके गंगाखेड**

मुसळधार अतिवृष्टीमुळे जायकवाडी धरणासह माजलगाव धरण पूर्णतः भरल्याने दोन्ही धरणांमधून गोदावरी नदीमध्ये पाण्याचा विसर्ग करण्यात आला यामुळे गंगाखेड शहरातून वाहणाऱ्या गोदावरी नदीचे बॅक वॉटर पाणी बरकत नगरमध्ये शिरले हे चित्र पाहून मनाला खुप वेदना झाल्या,माणूस म्हणुन मदत करणे हे आपले कर्तव्य आहे म्हणून मी आपली मदत नव्हे तर माझे कर्तव्य आहे या उदात्त हेतूने आपली मदत करण्यासाठी आलोय अशी भावना गंगाखेड नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष रामप्रभु मुंढे यांनी व्यक्त केली. दिनाक 28 सप्टेंबर रविवार रोजी भाजपा मंडळ



गंगाखेडच्या वतीने भाजपाचे माजी नगराध्यक्ष रामप्रभु मुंढे यांच्या वतीने पूरग्रस्त बरकत नगर भागातील नागरिकांना तांदूळ ज्वारी साखर पती मीठ मिरची डाळ गोडतेल अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले यावेळी ते बोलत होते. गोदावरी नदीच्या अतिमुसळधार पाण्यामुळे बरकत नगर मधील अनेक कुटुंबांचे घरे उद्धस्त झाले, घरांची पडझड होऊन जीवन विस्कळीत झाले. ही परिस्थिती पाहण्याकरिता रामप्रभू मुंढे यांनी रविवारी पाण्यामधून वाट काढत नुकसानीची पाहणी केली, येथील नागरिकांना धीर देऊन दिलासा दिला. संकटाच्या काळात कोणीही उपाशी राहू नये,या भावनेतून येथील नागरिकांना अन्नधान्य किटचे वाटप केले.यावेळी भाजपाचे रवि जोशी ,दिपक फड,अजय कांबळे,राजू भाई, सुनिल ठाकुर,विनोद शिंदे,ओमप्रकाश जवळेकर,शंकर हुरणे,रामदास भेंडेकर, श्रीकांत चौधरी,मोहन गिते,अरुण काळे, अंगदराव कोरडे,अभिमान केंद्रे,वैभव एलोरे आदि भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते

## बीडमध्ये पत्रकारपुत्र यश ढाका याच्या हत्येप्रकरणी आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी

बीड प्रतिनिधी बीड शहरात झालेल्या निर्घृण हत्येप्रकरणी आरोपींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे. निर्भीड पत्रकार संघाच्या महिला आघाडीकडून जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देण्यात आले असून, पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश ढाका याचा माने कॉम्प्लेक्स येथे गुंड टोळक्याने घेरून चाकूने वार करून खून केला. या घटनेमुळे शहरासह जिल्ह्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या हत्येचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, घटनेतील सर्व आरोपींना तात्काळ अटक करून हत्या मागील सूत्रधाराचा शोध घेऊन सखोल चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या या टोळीवर मोक्का अंतर्गत कारवाई करण्याची मागणी निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे. पत्रकार संघाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड शहरात गुन्हेगारी टोळ्या सक्रीय होत आहेत. पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी. निवेदनाच्या प्रत जिल्हाधिकारी, मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि पालकमंत्री यांनाही देण्यात आल्या आहेत. यावेळी यांच्यासोबत निर्भीड पत्रकार संघटनेच्या जिल्हाध्यक्ष किरण डोळस, जिल्हा सचिव आम्रपाली साबळे, जिल्हा उपाध्यक्ष मोनिका बेंद्रे, आदी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# महापुरात उध्वस्त रोकडे परिवाराला चर्चमध्ये आसरा

उमापूर प्रतिनिधी महापुराच्या पाण्याने जनजीवन विस्कळीत झाले असून गुळंज येथील गौतम रतन रोकडे यांचा संपूर्ण घरदारच जलमय झाले आहे. या आपत्तीत रोकडे परिवार मोठ्या संकटात सापडला आहे. विशेष म्हणजे त्यांच्या कुटुंबात पंधरा दिवसांची बाळंत आई आणि तिचं बाळही आहे. अचानक आलेल्या या परिस्थितीत कुटुंब कुठे जावे, हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला होता. याच दरम्यान रोकडे यांनी उमापूर येथील संत पौल बिलीवर्स ईस्टर्न चर्च विषयी माहिती घेतली आणि तातडीने संपर्क साधला. चर्च प्रशासनाने तात्काळ त्यांना आसरा दिला. सध्या रोकडे कुटुंबातील सुमारे 8 ते 10 सदस्य, घरातील सामान, धान्य, कोंबड्या, बकऱ्या तसेच बाळंत आई आणि तिचं नवजात बाळ गेल्या चार दिवसांपासून चर्चमध्ये सुरक्षित वास्तव्यास आहेत. चर्चच्या मदतीने त्यांच्या जेवणाची व्यवस्थाही करण्यात आली आहे. गावातील अनेक सामाजिक कार्यकर्त्यांनीही पुढाकार घेत मदतीचा हात पुढे केला. माजी उपसरपंच मदन भाऊ बनसोडे यांनी 50 किलो ज्वारी व किराणा किट दिले. सामाजिक

**गुळंज गावचे ८-१० जण, बाळंत आईसह चर्चमध्ये सुरक्षित**



कार्यकर्ते रवी भैय्या देशमुख यांनी एक वेळचे जेवण पुरवले. तर डायमंड अटोमोबाईलचे मालक अल्ताफ भाई सय्यद यांनी नाश्त्याची व्यवस्था केली. या संकटाच्या काळात गावकरी एकजुटीने पुढे आले असून रोकडे परिवारासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. गावातील नागरिकांच्या सहकार्यामुळे महापुराच्या संकटातही मानवीयतेचा दीप प्रज्वलित झाल्याचे चित्र उमापूर व परिसरात दिसून येत आहे.

# पूरग्रस्त लिंबगावसाठी धावलं खरात आडगाव

## दोन दिवसांपासून जेवणा खावणासह निवाऱ्याची व्यवस्था

माजलगाव : प्रतिनिधी

अतिवृष्टी आणि पुरामुळे संपूर्ण तालुका बेजार झालेला आहे. पुरामुळे तर सगळीकडे हाहाकार उडालेला आहे असे असतांना शेजारी शेजाऱ्याच्या कामी आल्याचे पाहावयास मिळत असून शुक्लतीर्थ लिंबगाव ला गोदावरी नदीला आलेल्या महापुराचा फटका बसल्यानंतर येथील नागरिकांना मुलाबाळांसह नजीकच्या खरात आडगाव मध्ये आश्रय घ्यावा लागला त्यात प्रशासन पोंचेल न पोंचेल याची वाट न पाहता माजी सभापती संभाजी शेजूळ आणि गावकऱ्यांनी दोन दिवस लिंबगावकरांना जेवण पाणी राहण्याची सोय तसेच ब्लँकेट वाटप करून माणुसकीचे दर्शन घडवून आणल्याचे पहावयास मिळत आहे.

आपत्तीच्या वेळी कोणी कमी पडो ना पडो पण शेजारी कामी पडतो असे म्हणतात त्याचीच प्रचिती मागील तीन दिवसांपासून खरात आडगाव आणि शुक्लतीर्थ लिंबगाव या शेजारी गावांमध्ये आली. गोदावरी नदीला आलेल्या महापुरामुळे शुक्लतीर्थ लिंबगाव येथील नागरिकांना लेकरा बाळांसह गाव सोडावे लागले अशा भयावह परिस्थितीत त्यांनी खरात आडगाव येथे जाऊन आश्रय घेतला एकीकडे प्रशासनाने केलेल्या निवाऱ्याचे ठिकाण कुचकामी ठरलेले दिसले तर दुसरीकडे गाव सरसावून काम करीत असल्याचे पाहायला मिळत आहे. प्रशासनाने दिखाव्यासाठी केलेला निवारा आणि तिथे होत असलेली दुर्व्यवस्था यावर संताप देखील व्यक्त होत आहे म्हणून गावकऱ्यांनी कमान हातात घेत मागील दोन दिवसांत शुक्लतीर्थ लिंबगावकरांची चांगली व्यवस्था केली तसेच गरजेच्या वस्तू देखील पुरवल्या जात आहेत माजी सभापती संभाजी





शेजूळ यांनी आपल्या शेतातच व्यवस्था केल्याने त्यांचे आणि खरात आडगावकर नागरिकांचे कौतुक होत असुन गंभीर परिस्थितीत प्रशासन सरकार लेट पण शेजारी थेट अशाप्रकारच्या प्रतिक्रिया शुक्लतीर्थ लिंबगावकर नागरिक व्यक्त करीत आहेत.

# उमापूर परीसरात बिबट्याचे ठसे आढळले, परीसरात भितीचे वातावरण

बीड / प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील उमापूर-राक्षसभुवन शेत शिवारात बिबट्या आढळून आल्याने खळबळ उडाली असून, परीसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, तो बिबट्याच होता का, या विषयी वन विभागाने खात्री करून घ्यावी, अशी मागणी शेतर्कयांनी केली आहे. सदरील प्राण्यांच्या पायाचे ठसे छायाचित्रात स्पष्ट दिसत आहेत. दरम्यान, मंगळवार ता. ३० रोजी उमापूर - राक्षसभुवन परीसरात दुपारी दोन वाजता एक बिबट्या सदृश मादी आणि तीन पिल्ले दिसल्याचे शेतर्कयांनी सांगितले आहे.

गेवराई तालुक्यातील उमापूर-राक्षसभुवन रस्त्यावरच्या शिवारात एक बिबट्या आणि तीन पिल्ले आढळून आली आहेत. मंगळवार ता. ३० रोजी दुपारी शेत शिवारातून वस्तीवर जाणाऱ्या शेतर्कयाने बिबट्याला पाहिले आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असून, शेतात जाणाऱ्यांनी स्वतःची काळजी घ्यावी,असे आवाहन करण्यात आले आहे. या आधी ही, गेवराई तालुक्यातील विविध भागात बिबट्या आढळून आला होता. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्याची खात्री करून घ्यावी, अशी मागणी होऊ लागली आहे. ज्या ठिकाणी हे प्राणी आढळून आले आहेत. त्या ठिकाणी त्यांच्या पायाचे ठसे छायाचित्रात स्पष्ट दिसत आहेत. एक बिबट्या मादी आणि तीन पिल्ले बराच वेळ त्या परीसरात फिरताना पाहिले असून, ती बिबट्या मादीच होती.



# बुखारी उर्दू शाळेतील लिपिक पठाण अबरार सर सेवा निवृत्त



बीड (प्रतिनिधी) : शहरातील प्रख्यात बुखारी उर्दू स्कूल मधील लिपिक म्हणून दीर्घकाळ कार्यरत असलेले पठाण अबरार सर हे नुकतेच सेवा निवृत्त झाले. त्यांच्या सेवाकाळाचा गौरव करण्यासाठी शाळेच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.अबरार सर यांनी आपल्या सेवाकाळात शैक्षणिक, प्रशासकीय आणि संघटनात्मक कामकाज अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने व उत्कृष्ट पद्धतीने पार पाडले. त्यांच्या कार्यकाळात शाळेच्या कारभारात पारदर्शकता आणि शिस्त टिकवून ठेवण्यात त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे.शाळेतील शिक्षकवर्ग, माजी विद्यार्थी आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, “पठाण सर यांनी केलेली सेवा ही भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे.”या वेळी आयोजित कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापकांनी त्यांचा शाल, श्रीफळ, मानपत्र आणि भेटवस्तू देऊन गौरव केला. सहकाऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमाच्या शेवटी अबरार सर यांनी सर्वांचे आभार मानत सांगितले की, “मी माझ्या सेवेत प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न केला. शाळेच्या प्रगतीत मी केलेला छोटासा वाटा लक्षात ठेवून मला गौरविण्यात आले, ही माझ्यासाठी मोठी जमेची बाजू आहे. पुढील आयुष्य मी समाजकार्य आणि अध्यात्माला वाहणार आहे.”

# राज्यात आता दुकाने, हॉटेल्स आणि इतर आस्थापने २४ तास

राज्यातील दुकाने आणि हॉटेल्स आणि इतर आस्थापनांना २४ तास खुले ठेवण्याची मंजूरी राज्य सरकारने दिली आहे. या संदर्भात राज्य सरकारने अद्यादेश काढला आहे. मद्य विक्री करणारी आणि मद्य पुरवणारी दुकाने वगळून इतर सर्व आस्थापनांना २४ तास खुले ठेवण्याची सूट देण्यात आली आहे. त्यामुळे मुंबई हे कधीही न झोपणारे शहर म्हटले जात होते. परंतू आता संपूर्ण महाराष्ट्रातच २४ तास दुकाने सुरु ठेवण्याची मंजूरी देण्यात आली आहे. राज्यात आता नाईट लाईफ सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता राज्यातील दुकाने, हॉटेल्स आणि इतर अस्थापना २४ तास उघडी ठेवता येणार आहेत. मद्यपान गृहे, बार परमिट रूम, हुक्का पार्लर, देशी बार वगळून इतर सर्व आस्थापना ,खाद्यगृहं, आणि दुकाने आता २४ तास सुरू ठेवण्याची सूट राज्य सरकारच्या उद्योग विभागातर्फे शासन निर्णय जारी करुन देण्यात आली आहे.

# उमापूर फाट्यावर धनगर समाज एस टी आरक्षणासाठी एक तास रस्तारोको

उमापूर /प्रतिनिधी

धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीच्या मागणीसाठी जालना येथे १७ सप्टेंबर २०२५ पासून दीपक बोराडे उपोषणाला बसले आहेत. दीर्घकाळ उपोषण सुरू असल्याने त्यांची तब्येत खालावली असून, या बातमीमुळे धनगर समाज बांधव संतापले आणि आक्रमक झाले काल बुधवार रोजी सकाळी उमापूर सर्कल च्या वतिने उमापूर फाटा येथे एक तास रस्तारोको आंदोलन करण्यात आले यावेळी पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला



होता. धनगर समाजाची प्रमुख मागणी एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीची आहे. मेंढपाळ, धनगर, हाटकर हे समाज पारंपारिकपणे भटकंती करणारे आणि



आर्थिक तसेच सामाजिकदृष्ट्या मागासलेले आहेत. त्यांना न्याय देण्यासाठी एसटी आरक्षणाची अंमलबजावणी तातडीने करावी, यासाठी समाज गेली अनेक वर्षे सातत्याने संघर्ष करत आहे दिपक बोराडे हे जालना येथे उपोषण करीत आहेत १ऑक्टोबर रोजी सकाळी अकराच्या सुमारास उमापूर फाटा येथे शेकडो धनगर समाज बांधव राज्य महामार्गावर जमले आणि त्यांनी रास्ता रोको आंदोलन सुरू केले. यावेळी आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला गेवराई शेवगाव मार्गावरील उमापूर फाट्यावर झालेल्या आंदोलनाने दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली यावेळी सकळ धनगर समाज उमापूर सर्कलच्या वतीने सपोउप निरिक्षक पानपाटील यांनी प्रशासनाच्या वतिने निवेदण स्विकारले.

# आ. संग्राम जगताप यांची पक्षातून हकालपट्टी करावी – वसिम शेख

बीड (प्रतिनिधी) |अहमदनगरचे आमदार संग्राम जगताप यांनी येत्या २ ऑक्टोबर रोजी ‘लव्ह जिहाद’ या मुद्यावर कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमावरून मोठा वाद निर्माण झाला असून समाजातील विविध घटकांनी संताप व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते वसिम शेख यांनी कडाडून विरोध नोंदवत अजितदादा पवार यांनी जगताप यांची पक्षातून हकालपट्टी करावी, अशी ठाम मागणी केली आहे. “जातीयवाद पसरवणारे कार्यक्रम महाराष्ट्राला शोभणारे नाहीत” वसिम शेख म्हणाले की, “महाराष्ट्र हे संतांच्या विचारांचे राज्य आहे. इथे एकोप्याचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला जातो. मात्र सध्याचे काही लोकप्रतिनिधी धार्मिक आधारावर समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत. ‘लव्ह जिहाद’ सारखे कार्यक्रम घेऊन जनतेमध्ये भीती, अविश्वास आणि वैरभाव पसरवणे हे लोकशाहीस घातक आहे.” त्यांनी पुढे सांगितले की, अशा प्रकारे प्रचार करणारे आमदार लोकप्रतिनिधी म्हणून समाजात शांतता राखण्याऐवजी उलट तणाव निर्माण करण्याचे काम करत आहेत. “जर अशा प्रकाराला आळा घातला नाही, तर महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात सांप्रदायिक दंगलीचे वातावरण निर्माण होण्याचा धोका आहे. त्यामुळे अजितदादांनी जगताप यांची हकालपट्टी करून ठोस संदेश द्यावा.” प्रशासनालाही जबाबदार धरण्याची मागणी नगर शहर प्रशासनाने अशा भडकावू कार्यक्रमांना परवानगी देणे योग्य नाही, असे मतही शेख यांनी व्यक्त केले. “कायद्याने आणि संविधानाने दिलेल्या अधिकारांच्या मर्यादेत राहून लोकप्रतिनिधींनी काम केले पाहिजे. धार्मिक तेढ वाढवणाऱ्या कार्यक्रमांना प्रशासनाने आळा घालणे आवश्यक आहे.



अन्यथा निर्माण होणाऱ्या गोंधळासाठी प्रशासनालाही जबाबदार धरले जाईल.” राजकीय व सामाजिक वर्तुळात खळबळ संग्राम जगताप हे अहमदनगर जिल्ह्यातील प्रभावशाली नेते मानले जातात. मात्र त्यांच्या ‘लव्ह जिहाद’ विषयक कार्यक्रमामुळे राजकीय व सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. काहींनी या कार्यक्रमाला पाठिंबा दिला असला, तरी मोठ्या प्रमाणावर विरोधही वाढत आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत या प्रकरणाला कोणते वळण मिळते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com